PARLE MAHOTSAV

Organiser - ADV. PARAG ALAVANI, President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE MAHOTSAV

कृपया प्रसिद्धीकरिता

# हजारो कलाकार आणि क्रीडापटूंना हक्काचे व्यासपीठ देत १४वा पार्ले महोत्सव संपन्न

मुंबई दि.३०: हजारो कलाकार आणि क्रीडापटूंना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारा १४वा पार्ले महोत्सव संपन्न झाल्याची माहिती प्रमुख आयोजक ॲड. पराग अळवणी यांनी दिली. तान्ह्या बाळापासून ८९ वर्षीय जेष्ठ नागरिकांपर्यंतच्या विविध वयोगटातील सुमारे २८ हजार स्पर्धकांनी ३८ स्पर्धांमधून महोत्सवात भाग घेत आपल्यामधील कलागुण सादर केले. महोत्सवात ३४० प्रथम पारितोषिकांसह २२०० हून अधिक पारितोषिके बहाल करण्यात आली तर केवळ दहा दिवसात हे सगळ घडून आणण्याची किमया सुमारे एक हजार कार्यकत्यांनी करून दाखवली अशी माहिती त्यांनी दिली.

एखादा उपक्रम सलग १४ वर्षे सातत्याने महोत्सव यशस्वी करण्याची अवघड कामगिरी करणाऱ्या महोत्सवातील कार्यकर्त्यांचे डॉ. किरीट सोमय्या यांनी अभिनंदन केले. तर मागील १४ वर्षे विलेपार्ल्यांमद्ये कला क्रीडा वातावरण करणाऱ्या पार्ले महोत्सवास आमचे प्रथमपासून सहकार्य असून पुढेही राहील, अशी ग्वाही साठ्ये महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कविता रेगे यांनी दिली. महोत्सवामध्ये सहभागी झालेले जेष्ठ अभिनेते विक्रम गोखले, सुधा चंद्रन, सुमित राघवन, दिलीप जोशी तसेच आंतराष्ट्रीय खेळाडू श्याम रहाटे, हर्षिल दानी, सायली राणे इत्यादी मान्यवरांनी पार्ले महोत्सवाच्या व्यासपीठाचा लाभ होतकरू स्पर्धकांनी करुन घ्यावा असे आवाहन केले.

स्पर्धांच्या आयोजनामध्ये नवा उच्चांक पार्ले महोत्सवाने गाठला, असे ॲड. पराग अळवणी यांनी सांगितले. एकाच व्यासपीठावरुन ३८ प्रकारच्या स्पर्धांचे आयोजनाबरोबर कबड्डीमध्ये १६०, वॉलीबॉलमध्ये ११५, फुटबॉलमध्ये १०० तर समूह नृत्यामध्ये २०० संघानी भाग घेतला. अन्य सर्वच स्पर्धांमध्ये स्पर्धक संख्येचा उच्चांकही १४ व्या पार्ले महोत्सवाने गाठले. यावर्षी मुंबईबाहेरील पुणे, रायगड, रत्नागिरी, धुळे, सांगली, सातारा, कोल्हापूर, जळगाव, नाशिक, नागपूर तसेच बंगलोर, चेन्नई, उत्तरप्रदेश येथूनही स्पर्धक व संघानेही भाग घेतला तसेच लंडन, दुबई, जपान व अर्जेंटिना येथूनही प्रत्येकी एक स्पर्धक सहभागी झाला होता. वाढत्या स्पर्धक संख्येसाठी ॲड. पराग अळवणी यांनी सर्वांचे आभार मानले असून शिस्तबध्दपणे महोत्सव संपन्न करण्यासाठी क्रीडा संघटना तसेच महोत्सवाच्या कार्यकर्त्यांचे त्यांनी आभार मानले. पुढील वर्षीच्या महोत्सवाच्या तयारीसाठी कार्यकर्त्यांची हीच ताकद सहाय्यकारी ठरेल, असा आशावाद ॲड. पराग अळवणी यांनी व्यक्त केला.

---

सदर पत्रक श्रीकृष्ण आंबेकर, कार्यालय प्रमुख, पार्ले महोत्सव यांनी प्रसिद्ध केले आहे.